पोलीस कोठडीत तसेच न्यायालयीन कोठडीत मृत्यू पावलेल्या आरोपींची माहिती राष्ट्रीय मानवी हक्क आयोगास कळविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,

परिपत्रक क्रमांक एचआरसी १०९५/४१/पोल-१४,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- १७ जानेवारी, १९९६.

## प_रि_प_त्र_क

पोलीस कोठडीतील पोलीसांच्या ताब्यातील आरोपींची देखभाल व मृत्यू पावलेल्या केसेसची प्रकरणे कशा प्रकारे हाताळावीत या बाबतची कार्यपध्दती शासन परिपत्रक, गृह विभाग एमयुआर ०७९०/सीआर १५८/पोल-११, दि. २२ नोव्हेंबर, १९९० नुसार विहित केली असून या कार्यपध्दतीचे उल्लंघन केलेल्या अधिका-यांच्या अभिलेखांत तसे प्रतिवेदन अधिका-यांनी नमूद करावे व त्रुटी झालेल्या अधिका-यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहेत.

२. जगात सर्वत्र मानवी हक्क जोपासणा करण्याबाबत प्राधान्य देण्यात येत आहे. भारतीय राज्य घटनेत सुध्दा नागरीकांचा हक्क कसा सुरक्षित राहील या दृष्टीकोन समोर ठेवण्यात आला आहे. देशात मानवी हक्क अधिनियम १९९३ मधील तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली असून त्या आयोगाचे सांविधिक कार्यही सुरु झालेले आहे. या अनुषंगाने शासन परिपत्रक गृह विभाग एचआरसी ११९४/जीआय २७३/सीआर ३/विशा-१ब, दि. १५ मार्च, १९९५ नुसार पोलीस कोठडीतील मृत्यू याबाबतच्या घटनांचा ती घटना घडली असेल त्या क्षणापासून २४ तासाच्या आत अहवाल पाठविण्याची विनंती करण्यात आली असून राष्ट्रीय मानवी हक्क आयोगास जास्तीत जास्त सहकार्य करण्याची विनंती संबंधितांना करण्यात आली आहे.

३. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने काही राज्यातून फक्त पोलीस कोठडीत झालेल्या मृत्यूबाबतचाच अहवाल प्राप्त होत असतो असे नमूद करुन पोलीस कोठडीत तसेच न्यायालयीन कोठडीत झालेल्या मृत्यूबाबतचाही अहवाल पाठविण्याची आवश्यक आहे असे कळविले आहे. या शिवाय राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने सन १९९४-९५ या वार्षिक अहवाल सादर केला असून सदरहू अहवाल संसदेच्या दोन्ही सभागृहात हिवाळी अधिवेशनात सादर केला जाणार आहे. त्या अहवालातील परिच्छेद ४.२६ पोलीस कोठडीत न्यायालयीन कोठडीमध्ये मृत्यूच्या घटना घडल्यास त्या घटना ज्यावेळी घडतील त्या

..२..

क्षणापासून २४ तासाच्या आत त्या घटनेचा सविस्तर अहवाल राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाकडे पाठविण्याचे स्पष्ट केले आहे. पोलीस अथवा न्यायालयीन कोठडीत होणा-या मृत्यूबाबत राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. तरी उपरोक्त नमुद केलेल्या शासन परिपत्रकात दिलेल्या आदेशांना अधिन राहून पोलीस कोठडीत अथवा न्यायालयीन कोठडीत झालेल्या मृत्यू प्रकरणाबाबतचा अहवाल [इंग्रजीत] मृत्यूची घटना घडलेल्या क्षणापासून २४ तासाच्या आंत, राष्ट्रीय मानवी हक्क आयोगास पाठविण्याची दक्षता घ्यावी. व त्याची प्रत शासनास सादर करावी. तसेच वरउल्लेखलेल्या दिनांक २२.११.९० च्या परिपत्रकातील मुद्दा क्र. २[८] प्रमाणे सविस्तर अहवालही शासनास विनाविलंब पाठवावा. या आदेशाचे कटाक्षाने पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

सही/-

[ अ. दा. कारखानीस ]

उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सचिव [परिवहन], गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस उपमहानिरीक्षक,
कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व पोलीस अधिक्षक,
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल.